

# आद्य रंगभूमीवरच्या गंमती जमती

♦ जयमाला शिलेदार

५ नोव्हेंबर १८४३ साली विष्णुदास भाव्यांच्या 'सीतास्वयंवर' या मराठी नाटकाने मराठी नाट्यसृष्टीचा आरंभ झाला. सांगलीचे संस्थानिक पटवर्धन यांच्या प्रेरणेने हा प्रयोग साकारला. नटाचे तोंड पाहू नये असा सनातनी मंडळींचा खाक्या असल्याने पात्रे जमवताना विष्णुदासांना फार अडचणी आल्या. शेवटी श्रीमंतांच्या आश्रितातूनच त्यांनी पात्रे निवडली. पात्रांची निवड पुढील पद्धतीने होई. स्त्रीपार्टी, देवपार्टी आणि राक्षसपार्टी अशा तीन विभागांसाठी माणसांचा शोध घेतला जाई. तेरा-चौदा वर्षांची, आवाज न फुटलेली गोरीगोमटी मुले स्त्रीपार्टीसाठी निवडली जात. तर उंचीपुरी, गोरीपान, प्रकृतीने भक्कम माणसे देवपार्टीसाठी. तर तशीच उंचीपुरी, प्रकृतीने भक्कम आणि पण वर्णाने काळी माणसे राक्षस पार्टीसाठी निवडली जात. स्त्रियांना रंगभूमीवर प्रवेश नव्हता.

मराठी रंगभूमीवरचे एक ज्येष्ठ कलाकार विनोदमूर्ती वसंत शिंदे यांनी दादासाहेब फाळके यांच्या मूकपटात भूमिका केल्या होत्या. त्यांच्या आठवणीनुसार तेव्हाचे डायरेक्टर नटांना ओरडून सूचना देत. त्याबरहुकूम नटमंडळी अभिनय करीत असत. अभिनयाचीही नंबरवारी होती. हसणे, रडणे, रागावणे अशा भावना व्यक्त करण्यासाठी पुढीलप्रमाणे अभिनय शिकवला जाई.

हसणे – १. स्मितहास्य २. दात दाखवून खुदूखुदू हसणे ३. हा!हा!हा! असा आवाज काढून सातमजली हसणे ४. खदाखदा हसत, पोट दाबून गडबडा जमिनीवर लोळणे.

रडणे – १. ओठ वाकडे करून मुसमुसणे २. स्फुंदून स्फुंदून रडणे ३. किंकाळी मारून सूर लावून रडणे ४. किंकाळ्यांचा वेग आणि सूर वाढवून धाडदिशी जमिनीवर अंग टाकून डोके आपटणे.

रागावणे – १. वटारणे २. डोळे वटारून जोरजोरात श्वासोच्छवास करणे. ३. नंबर १ व २ च्या बरोबर हातपाय आपटणे, आरडाओरडा करणे, वस्तू फेकणे. ४. तिन्ही नंबरांसहित आरडाओरडा वाढवत, थयथयाट करत, आदळआपट करणे. समोरच्या पात्राला थोबाडून काढणे, वेळप्रसंगी त्याला गचांडी देणे.

थिएटरमध्ये प्रत्यक्ष मूकपट सुरू झाला की, चालू प्रसंग समोर बसलेल्या वाद्यवृंदातली माणसे फ्रन्ट ग्राऊंडने वाद्ये वाजवून आणि स्वतःच ओरडून इफेक्टिव्ह करीत. मात्र शूटिंगच्या वेळी वेगळीच गंमत असे. डायरेक्टर, कॅमेरा, ॲक्शन असे ओरडतानाच येश्या नंबर दोन रड, जग्या नंबर चार हाण (म्हणजे रागव) आणि वशा नंबर तीन हास अशा सूचना देई आणि बालनट त्याप्रमाणे अभिनय करीत. जास्त करून धार्मिक विषयांवरचे चित्रपट व बालनटांची भरती असल्यामुळे रडणे, हसणे, रागावणे यापलीकडे अभिनय जात नसे. त्यामुळे इतर भावनांची नंबरवारी माहीत नाही.

रंगभूमीच्या सुरुवातीच्या काळात अशाच प्रकारे वर्गवारीने अभिनय होत असे. स्त्रीपार्टी अशिक्षित असल्याने त्यांना संवाद कमीतकमी असत. देवपार्टी लोक लंबीचवडी संस्कृतप्रचूर भाषणे

ठोकत असत. तर राक्षसपार्टी लोक चेहऱ्यावर लाल, पिवळे, पांढरे फराटे ओढून, पत्र्याचे खोटे मोठे दात लावून, झाडांच्या फांद्या, झावळ्या कमरेला बांधून, राळ उडवीत, आरडाओरडा करत येत. उपस्थित प्रेक्षकातील मुले आणि स्त्रिया भयभित होत. एकदा एका संस्थानातला हत्ती मस्त होऊन धुमाकूळ घालत असताना पैज मारून ताके नावाच्या एका राक्षस पार्ट्यांने राक्षसाचा पार्ट वठवत आरडाओरडा केल्यावर तो हत्ती भांबावून जागच्या जागी थांबला आणि माहुताने त्याला जेरबंद केले. या अचाट पराक्रमावर खूश होऊन संस्थानिकांनी तो हत्ती नाटक कंपनीला बक्षीस दिला. पण एका दिवसातच त्या हत्तीने मंडळींचा महिन्याभराचा शिधा फस्त केल्याने मंडळींनी त्या गजांतलक्ष्मीला पुन्हा परत पाठवून दिले.

हे रंगभूमी बालबोध स्वरूप पुढे काही काळाने तत्कालीन शिक्षित मंडळींना हास्यास्पद वाटू लागले. यक्षगानाच्या प्रेरणेमुळे काही नाटकात नट संवादाच्या शेवटी 'तागड थोम' असे उच्चारीत. शिक्षित मंडळी त्यांना 'तागड थोम' नाटके संबोधित. तर राक्षस पार्टीच्या आरडाओरड्यामुळे 'अललडुर्र नाटके' असे म्हणत. काही वेळा प्रश्नोत्तर रूपी संवाद असले तर प्रत्येक वाक्याला मध्ये व शेवटी हा आणि हू असे हुंकार देण्याची प्रथा बोकाळली होती. अण्णासाहेब किर्लोस्करांनी त्या नाटकांना 'हाणीहूम नाटके' असे म्हटले होते. सांगलीचे महाराज कालवश झाल्यावर विष्णुदास भाव्यांच्या नाटक मंडळींची फाटाफूट झाली. नटमंडळींना 'ग' ची बाधा होऊन त्यांनी सवतेसुभे करण्याची प्रथा तेव्हापासूनच पडली. तरीही विष्णुदास भाव्यांनी अगदी मुंबईत येऊन खेळ करून वाहवा मिळवली. पण नटांच्या असहकारामुळे चिडून त्यांनी नाटक मंडळ बंद केले आणि कळसूत्री बाहुल्यांचे खेळ केले. तेही यशस्वी झाले. त्यांनी बनवलेल्या दोन बाहुल्या शब्दभ्रमकार रामदास पाध्ये यांनी पाहिल्यावर विष्णुदासांच्या हुन्नरापुढे रामदास चकित होऊन गेले. या बाहुल्यांच्या अनेक कळींचा मलाही उलगडा झाला नाही अशी प्रांजळ कबुली त्यांनी दिली होती.

विष्णुदासांच्या प्रयोगानंतर अनेक नाटक मंडळे आली. परंतु अण्णासाहेब किर्लोस्करांच्या 'शाकुंतल' नाटकाने संगीत नाटकाचा एक स्वतंत्र फॉर्म विकसित केला आणि अवघ्या महाराष्ट्राला या करमणुकीने एका छताखाली आणले. अर्थात पहिल्या 'शाकुंतला'त पदांची संख्या दोनशेहून अधिक होती. त्यातील शंभरएक पदे एकट्या दुष्यंताला होती. नाटकाचे तीन अंक या शनिवारी तर पुढचे दोन अंक पुढच्या शनिवारी होत. एका खाशा टीकाकाराने अण्णासाहेबांना म्हटले होते की, या नाटकात एक कमी खटकते. अण्णासाहेबांनी कुतूहलाने त्याला विचारले, ''कोणते बरं ते?'' तेव्हा टीकाकार महाशय उत्तरले, ''डोअरकिपरला पदं घालायची राहिली वाटतं.''

'शाकुंतला'चे नायक मोरोबादादा वाघोलीकर हे उत्तम गवयी होते. त्यांना तमाशाचा खूप नाद होता. लावण्या उत्तम गात असत. हे नाटक निघाले नसते तर ब्राह्मणी तमाशाचा फड उभा करायचा त्यांचा बेत नक्की झाला होता. नाटकाच्या वेळेला ते अतिशय अस्वस्थ असायचे. नाटकात त्यांचं वाक्य चुकलं तर विंगेतल्या प्रॉम्पटरची खैर नसे. मोरोबा आत आले की, फाडदिशी त्याच्या कानफटात थप्पड लगावत असत. सुरुवातीला नाटकाच्या संगीत साथीला चार तंबोरे, तबला किंवा मृदुंग असत. नाटक मंडळीतल्या नव्या भरतीच्या पोरांना संपूर्ण नाटकभर तंबोरे वाजवण्याचे काम करावे लागे. सगळेच पुरुष काम करणारे असल्याने एकच सूरपट्टी ठरलेली असे. कालांतराने हार्मोनियमचा समावेश झाला. तेव्हा संगीतज्ज्ञ बाळकोबा नाटेकरांनी नापसंती दर्शवत म्हटलं होतं, 'हे बारा सुरांचं खोकं आलं. आता मंडळी सुरात गायचा आळस करतील.'

पूर्वीच्या कंपन्या सर्कसप्रमाणे गावोगावी महिना दोन महिना मुक्काम करून आपले खेळ करीत. नटमंडळी एखाद्या कुटुंबाप्रमाणे एकत्र असत. चहा, जेवण, तालिम या सगळ्या गोष्टींसाठी घंटानाद होत असे. जेवणानंतर दुपारची वामकुक्षी घेण्यासाठी पहुडलेल्या मंडळींच्या कानावर तालमीला येण्याचा घंटानाद आला की चडफडत नटमंडळी उठत.

ही लकब सुभद्रेचे काम करणाऱ्या स्त्रीपार्टी बुवांना चांगलीच नडली. अर्जुन सुभद्रेचे पाणिग्रहण करतो. पदाच्या प्रसंगी 'देई सखी गाढ आलिंगनाते' असे अर्जुनाने म्हटल्यावर सुभद्रेने अर्जुनाच्या उजव्या खांद्यावर टेकवण्यासाठी मान जेव्हा झुकवली तेव्हा नेमका अर्जुनबुवांचा उजवा पाय फूटभर मागे गेला आणि तोल जाऊन सुभद्रा बिचारी जमिनीवर पडली. संतापलेल्या सुभद्रेने दातओठ खात सुभद्रेचे पद आळवायला सुरुवात केली, 'बहुत छळियले नाथा, व्यर्थ शिणविले नाथा.'

स्त्रियांचा हळूहळू रंगमंचावर प्रवेश होऊ लागला होता. साहजिकच स्त्रियांनी रंगभूमीवर कामे करावीत की नाहीत या प्रश्नावर बरेच परिसंवाद झडत होते. गंधर्व कंपनीचा मुक्काम असाच एका छोट्या गावात होता. सावित्री हे नाटक जोरात चालले होते. कंपनीला दूध पुरवणारा गवळी दररोज भाविकतेने नाटक पाहायचा. शेवटच्या अंकात येणारा पुठ्ठयाचा रेडा पाहून तो मनोमनी हळहळायचा. एकदा धीर करून त्याने बालगंधर्वांचे पाय धरले, 'नाना एक मागणं आहे. माझा रेडा अगदी गरीब आहे. तुमच्या नाटकात त्याला एंट्री द्या ना.' अगदी एकदाच. बालगंधर्वांनी त्याला साफ नकार दिला. मग त्याने बापूसाहेबांना

गाठलं. (बालगंधर्वांचे धाकटे बंधू) त्याचे रोजचे टुमणे ऐकून कंटाळून बापूरावांनी तालमीच्या अटीवर त्याला परवानगी दिली. तालमीत खरोखर रेड्याने अगदी कसलेल्या नटाप्रमाणे काम केले. मंडळी खूश झाली. रात्रीच्या प्रयोगात त्याला आणायचे ठरले. प्रयोग सुरू झाला. शेवटच्या अंकात ठरल्या वेळी यमाबरोबर रेड्याने एंट्री केल्याबरोबर प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन टाळ्यांचा कडकडाट केला. समोरचे फूटलाइटस, तो टाळ्यांचा कडकडाट याची त्या रेड्याला सवय नव्हती. त्याची गरिबी संपून तो एकदम मस्तवाल बनला. यमराजाने घाबरून लांब सरकून विंगेचा आधार घेतला. आता तो रेडा डोळे वटारून ढाणढाण खूर आपटायला लागला. आणि नाकातून फुत्कार टाकू लागला. त्याच्या तोंडाचा फेस पार मेलेल्या सत्यवानाच्या अंगावर उडाला. एकदम सत्यवान यमाच्या आशीर्वादाच्या आधीच जिवंत होऊन रांगत रांगत विंगेत निघून गेला. नाटकाचा बोजवारा उडाला. नाटकानंतर जेवणाची प्रथा असल्याने पंगत बसली तेव्हाही सर्व मंडळी मघाचा प्रसंग आठवून हसत खिदळत होती. तेवढयात मा. कृष्णराव म्हणाले, 'अलीकडे बायकांनीच बायकांची कामं करावी असा विचार जोर धरतोय. माझा त्याला पूर्ण पाठिंबा आहे. पण रेड्यानी रेड्यांची कामं करावी असं जर कोणी म्हणाला तर त्याला मी पहिला विरोध करीन.'

विनोदमूर्ती वसंतराव शिंद्यांची मूकपटाच्या वेळची एक आठवण थोडीशी करुण पण गंमतीशीर आहे. पहाटेच सगळी मुलं आऊट डोअर शूटिंगला गेली. डोळयावरची झोप उडालेली नव्हती. ड्रेपरीवरच्या माणसाने त्यांच्या तोंडावर गणपतीचा सोंडेसकट मुखवटा चढवला आणि शूटिंगला सुरुवात केली. गणपती आणि रिद्धीसिद्धी नाचत असतात असा प्रसंग. वसंतराव गणपतीच्या वेशात नाचू लागले आणि सोंडेत बसलेला विंचू त्यांच्या नाकाला नांगी मारू लागला. वसंतरावांना असह्य वेदना होऊ लागल्या. त्यात ते वेडयावाकडया उडया मारू लागले. डायरेक्टर त्या डान्सवर बेहद्द खूश झाले आणि ओरडून सांगू लागले, छान छान वशा असाच नाचत रहा. इकडे वसंतराव बास, बास. थांबवा थांबवा, असे ओरडत होते. पण वाद्यांच्या गजरात, सोंडेच्या आवरणामुळे त्यांचा आवाज कोणाला ऐकू येईना. अखेरीस अतिश्रमाने बिचारे वसंतराव बेशुद्ध पडले. तेव्हा सगळी मंडळी धावत त्यांच्याकडे गेली. त्यांच्या तोंडावरचा मुखवटा दूर केल्यावर तो विंचू आणि त्याच्या दंशाने टरारून सुजलेले नाक दिसल्यावर सगळ्यांच्याच हृदयात चर्र झाले. लगेच त्यांना दवाखान्यात नेऊन उपचार केले गेले.

प्राण्यांना रंगमंचावर आणल्यावर काय होईल आणि काय नाही ते काही सांगता येत नाही. 'शाकुंतल' नाटकात पुढ्याचं हरीण येत असे. तर 'स्वयंवर' नाटकात पुढ्याची गाय. पण एकदा एका नटवर्यांनी 'आग्र्याहून सुटका' या ऐतिहासिक नाटकात रंगमंचावर घोडयावरून एन्ट्री घेण्याचा आग्रह धरला. कोल्हापूरला पॅलेस थिएटरमध्ये प्रयोगाआधी बऱ्याच तालमी घेतल्या. घोडयाने चांगले सहकार्य दिले. नाटकाचा दिवस उजाडला. प्रयोग हाऊसफुल्ल होता. प्रत्यक्ष घोडयावरून स्वारीची जोरदार जाहिरात झाली होती. प्रयोगात तो विशिष्ट प्रसंग आला. शिवाजी महाराज झालेल्या नटवर्यांनी घोडयावरून स्टेजवर एन्ट्री घेतली. खरोखरच दृश्य सुंदर दिसले. प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. घोड्याला त्या टाळ्यांची सवय नसल्यामुळे तो बिथरला आणि जोराने खिंकाळून त्याने पुढच्या दोन टापा उंचावल्या. त्याची नटवर्यांना सवय नव्हती. घाबरून त्यांनी पडद्याच्या झालरींना पकडले. इकडे घोड्याने पुढच्या टापा टेकवल्या आणि तो सरळ आत विंगेत निघून गेला. नटवर्य शिवाजी महाराज झालरीलाच लटकले. सगळीकडे हशाचा धबधबाच सुरू झाला. आत सगळे गडबडले. शो मस्ट गो ऑनचा खाक्या पाळण्यासाठी औरंगजेबाने स्टेजवर एन्ट्री घेतली. 'कहाँ है शिवाजी? कहाँ है शिवाजी?' या वाक्यालासुद्धा ऑडियन्स पोट धरून हसत राहिले. इकडे झालरीला लटकलेल्या शिवाजीने तिथूनच औरंगजेबाला ओरडून चार चार फुल्यांच्या शिव्या देत, मी इथं आहे. तू आधी इथं ये असे सांगितले. औरंगजेब त्याच्याजवळ गेला. शिवाजीराजे औरंगजेबाच्या खांद्यावर बसले आणि मगच त्यांची खऱ्या अर्थाने सुटका झाली.

अशा या गमती. नाटक म्हणजे खऱ्याचा आभास. पण अतिरेकी रिॲलिस्टिक दाखवण्याच्या फंदात कधी कधी फजिती होते ती अशी. इंग्रजी शब्दांच्या वापराची अनेक उदाहरणे आहेत. पण विस्तारभयास्तव आवरती घेतली आहेत. या निमित्ताने रंगभूमीच्या सुरुवातीच्या काळातील काही गंमतीदार गोष्टी सांगत थोडा इतिहासही सांगण्याचा प्रयत्न केला आहे. 'स्पंदन'च्या सर्व वाचकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा देऊन निरोप घेते. धन्यवाद.

♦

**जयमाला शिलेदार, पुणे.**

